म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा.वा.
दा. क्र. 3268

# बाल पंचतंत्र २



BVBK-0403274
BVBK-0403274

वाचनालय
भा.वा.
३२५७
२१।३।६०

म. ग्रं. सं. …, …ालय …
… बाराव
क्र. ३२५७ … २१।३।६०
विषय बा.वा.

# बाल पंचतंत्र

## भाग दुसरा

लेखक
त्र्यंबक पुरुषोत्तम थोरात

BVBK-0403274

केशव भिकाजी ढवळे

किंमत ३ रुपये

बाल

# निवेदन

पंचतंत्र

ज्ञानदान करण्याचे वाङ्मयाचे जे अनेक प्रकार आहेत त्यांत 'कथा किंवा गोष्ट' ह्या प्रकाराला फार वरचे स्थान दिले जाते. हा प्रकार प्राचीन काळापासून आपल्या देशात रूढ आहे. उपनिषदांसारख्या वेदान्दपर ग्रंथांतील गहन तत्त्वे सुलभ रीतीने समजावून देण्यास प्राचीन ऋषींनी गोष्टींचाच आश्रय केलेला आढळतो. महाभारतकारांनीसुद्धा दृष्टान्तांकरता अनेक सुंदर कथा सांगितलेल्या आहेत. बुद्ध, महावीर, ख्रिस्त, महंमद ह्यांसारख्या महान धर्मप्रवर्तकांनी गोष्टींच्याच साह्याने आपला उपदेश लोकांच्या मनात ठसविला ह्याची साक्ष त्यांचे ग्रंथच देतात.

बालवाङ्मयात तर गोष्टीला अग्रस्थानच देण्यात आले आहे. कल्पित कथांची मुलांना अत्यंत आवड असते. ह्यामुळे त्यांच्या साह्याने एखादा उपदेश किंवा नीतितत्त्व बालमनावर मनोरंजक रीतीने सहज बिंबविता येते.

संस्कृत वाङ्मयात हितोपदेश व पंचतंत्र हे दोन कथाग्रंथ अत्यंत लोकप्रिय झालेले आहेत. दोन्ही ग्रंथांची रचना एकाच पद्धतीची आहे. एक मोठी कथा घेऊन तींत अनुषंगाने अनेक उपकथा सांगून मूळ तत्त्वाचे स्पष्टीकरण करावयाचे, ही ती पद्धती होय. स्पष्टीकरण करताना ग्रंथकर्त्यांनी अनेक सुभाषिते व व्यवहारांतील नीतितत्त्वे ह्यांचा संग्रह केला. त्यामुळे सदर ग्रंथ अबालवृद्धांस व्यवहारज्ञान शिकविण्यास समर्थ झाले आहेत.

तथापि लहान मुलांच्या मनोधर्माचा विचार केल्यास, त्यांना अवांतर उपदेशापेक्षा सरळ लिहिलेली मूळ कथाच जास्त आकर्षक वाटते. ही मनोवृत्ती लक्षात घेऊन मी पंचतंत्रातील अन्यत्र प्रसिद्ध न झालेल्या अशा काही सुंदर गोष्टी निवडून त्या पाच भागांत लिहिल्या आहेत. त्यांची भाषा शक्य तितकी सुबोध ठेवली असून प्रसंगानुरूप चित्रेही दिली आहेत.

त्र्यं. पु. थोरात

© केशव भिकाजी ढवळे

पुनर्मुद्रण : एप्रिल १९९५

लेझर टाइपसेटिंग : दि विझिविग, श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई ४

मुद्रक
स. ग. परुळकर
जस्मिन आर्ट
वडाळा उद्योग भवन
वडाळा, मुंबई ३१

प्रकाशक
ज्योती धनंजय ढवळे
केशव भिकाजी ढवळे
पहिली मटवाडी
गिरगाव, मुंबई ४

बाल पंचतंत्र : २

गोष्ट पहिली

# लबाड व्यापारी

एका नगरीत एक वाणी राहात होता. त्याचे नाव होते धनंजय. त्याचा धंदा चांगला चालत होता; म्हणून त्याने मोठ्या श्रीमंतीत व चैनीत दिवस घालवले; पण पुढे काही काळाने धंदा चालेनासा झाला व त्याला गरिबी आली. तेव्हा त्याने विचार केला की, ज्या ठिकाणी आपण श्रीमंतीत दिवस घालवले त्याच ठिकाणी गरिबीत राहाणे हलकेपणाचे आहे; म्हणून आपण दुसऱ्या देशात निघून जावे.

त्याच्या घरात वाडवडिलांपासूनचा एक प्रचंड तराजू होता. तो त्याने एका व्यापाऱ्याजवळ आपली ठेव म्हणून ठेवला व तो देशांतरास निघून गेला. बरेच दिवस तिकडे राहिल्यानंतर तो पुनः आपल्या नगरात आला आणि त्या व्यापाऱ्याजवळ आपला तराजू मागू लागला. तेव्हा तो व्यापारी म्हणाला, 'वेड्या, इतके दिवस तराजू कसा राहाणार ? तो केव्हाच उंदरांनी खाऊन टाकला.'

धनंजयला त्याची लबाडी समजली. त्याची खोड मोडण्याची त्याने युक्ती योजली. तो शांतपणे व्यापाऱ्यास

म्हणाला, ' खरोखरच उंदरांनी खाऊन टाकला ना ? बरे झाले. त्यांचा भाग होता तो त्यांनी खाल्ला. तूं तरी काय करणार ! संसार असाच आहे. असो. आता मी आंघोळीला जात आहे. तेव्हा पूजेचे साहित्य नेण्याकरता तूं आपला मुलगा देशील तर बरे होईल. '

आपली तराजूची चोरी पचली म्हणून व्यापाऱ्याला आनंद झाला होता. त्या आनंदाच्या भरात त्याने मुलाला म्हटले, ' बाळ, तुझे हे काका बरं का ? ह्यांच्याबरोबर त्यांचे पूजेचे साहित्य घेऊन नदीवर जा आणि ते सांगतील ते काम मुकाट्याने कर. '



नंतर धनंजय त्या मुलाला घेऊन नदीवर गेला. तेथे स्नान वगैरे आटोपल्यावर त्याने त्या मुलाला नदीच्या जवळच एका गुहेत लपवून ठेवले आणि

तिच्या तोंडाशी एक भली मोठी दगडाची चीप बसवून तो परत आला.

तो एकटाच परत आलेला पाहून व्यापाऱ्याने विचारले, ' मुलगा कोठे आहे ? माझा मुलगा आताच्या आता आणून दे. '

धनंजय म्हणाला, ' मी आंघोळीकरता नदीत उतरलो, तोच एक बहिरी ससाणा आला व मुलाला चोचीत धरून आकाशात घेऊन गेला. आता मी मुलगा कोठून देऊ ? '

व्यापारी म्हणाला, ' वाः, चांगलाच भामट्या दिसतोस ! बहिरी ससाणा कधी मुलगा उचलून नेऊ शकेल काय ?

धनंजय म्हणाला, ' का बरे, यात तुला एवढे अशक्य काय वाटते ? लोखंडाचा तराजू जर उंदीर खाऊ शकतात तर बहिरी ससाणा मुलगा का नेऊ शकणार नाही ? तुला मुलगा पाहिजे असेल तर माझा तराजू मला परत दे !

व्यापाऱ्याने न्यायाधिकाऱ्याकडे तक्रार नेली. तेव्हा धनंजयने त्यांना आपली सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून अधिकारी हसले व त्यांनी आधी धनंजयचा तराजू त्यास देवविला. नंतर धनंजयने व्यापाऱ्यास त्याचा मुलगा आणून दिला.

गोष्ट दुसरी

# गुप्तधन व भुक्तधन

एका शहरात दोन वाणी राहात होते. एकाचे नाव गुप्तधन व दुसऱ्याचे नाव भुक्तधन. गुप्तधन अतिशय कंजूसपणाने वागून पैसा साठवून ठेवीत असे. भुक्तधन हा मिळेल तितका पैसा कुटुंबाकरता व परोपकाराकरता खर्च करीत असे.

एके दिवशी संध्याकाळी गुप्तधनकडे एक पाहुणा आला. त्याला पाहाताच गुप्तधन त्याच्या अंगावर एकदम् खेकसून म्हणाला, 'ह्या पाहुण्यांनी तर अगदी नकोसे



करून टाकले आहे.' पाहुण्याने तिकडे लक्ष न देता आपले बोचके ओटीवर टेकलेच. जेवणाची वेळ झाली तेव्हा गुप्तधनने आदळापट करीत व अपमानाचे शब्द बोलत पाहुण्याला जेवायला बोलाविले. पाहुण्याला फार भूक लागली असल्यामुळे त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता त्याने जेवणावर यथेच्छ हात मारला. गुप्तधन ते पाहून अगदी अस्वस्थ झाला. पाहुण्याने दोन माणसांचे अन्न उठवले ह्या नुकसानीबद्दल त्याच्या कंजूस मनाला अतिशय दुःख झाले; पण करतो काय!

दुसऱ्या दिवशी गुप्तधनच्या पोटात दुखू लागून त्यास अमांश झाला. अर्थात् सर्व दिवस त्यास उपाशी राहावे लागले, तेव्हा त्याचे पोट दुखायचे थांबले; तथापि त्या समाधानापेक्षा स्वतःच्या उपासाने आदल्या दिवशी पाहुण्याच्या जेवणामुळे झालेले नुकसान भरून निघाले याबद्दल त्यास जास्त समाधान वाटले.

तो पाहुणा सकाळी उठून दुसरीकडे गेला. या दिवशी त्याने आपले बिऱ्हाड भुक्तधनकडे ठेवले. पाहुणा आलेला पाहून सर्व मंडळींना आनंद झाला. त्यांनी त्याचा चांगला आदरसत्कार केला. भुक्तधनने जेवणाच्या वेळी त्याला आग्रह वगैरे करून फार अगत्य दाखवले. जेवणानंतर तो पाहुण्यांशी बराच वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसला. रात्र

झाल्यावर त्याला बिछाना वगैरे घालून देऊन त्याने त्याची निजावयाची चांगली व्यवस्था केली. त्याचे ते अत्यंत नम्र व आदराचे वर्तन पाहून पाहुण्याला फार समाधान वाटले व तो आनंदाने झोपी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने भुक्तधनचा मोठ्या आदराने निरोप घेतला व तो राहाण्याचा आग्रह करीत असतानाही दुसरीकडे प्रयाण केले.

दुसऱ्या दिवशी भुक्तधनला व्यापारात खूपच फायदा झाला.

बालवाचकहो, तुम्हाला या दोघांपैकी कोण आवडतो?

बाल पंचतंत्र : २

गोष्ट तिसरी

## बोकेशास्त्री

एका झाडाच्या ढोलीत एक चिमणा घरटे करून राहिला होता. त्याचे नाव कपिंजल. त्याच झाडावर एक कावळा राहात असे. त्याच्याशी कपिंजलची मैत्री जमली. रोज सकाळी ते चरावयास जात व संध्याकाळी घरी परत आल्यावर आपण पाहिलेल्या मौजेच्या गोष्टी एकमेकांस सांगत

असत. अशा तऱ्हेने बरेच दिवस ते आनंदात राहिले. पुढे एके दिवशी कपिंजल आपल्या दुसऱ्या मित्राबरोबर चारापाणी मिळविण्याकरता दूरच्या एका सुपिक प्रदेशात गेला. तेथे खाण्यापिण्यास मुबलक असल्याने पुष्कळ दिवस तो तेथेच राहिला. इकडे त्याच्या रिकाम्या पडलेल्या घरट्यात एक ससा येऊन राहिला.

काही दिवस लोटल्यावर कपिंजल परत आपल्या घरट्याकडे आला. आपले घरटे सशाने बळकावले आहे हे पाहून तो फार संतापला. तो सशाला म्हणाला, 'हे घरटे माझे आहे. तू चालता हो येथून. दुसऱ्याचे घरटे बळकावण्यास तुला शरम नाही वाटत?'

ससा शांतपणे म्हणाला, 'बाबा रे, विहीर, तळे, सरोवर व झाड ही एकदा सोडून गेल्यावर त्यावर कोणालाही हक्क सांगता येत नाही. मालकासमक्षसुद्धा जो घराची बारा वर्षे वहिवाट करील त्याच्या मालकीचे ते होते; मग सोडून गेलेल्या घराची गोष्टच बोलायला नको! हल्ली हे घर माझ्या ताब्यात आहे. तेव्हा मीच त्याचा मालक आहे. तुझा त्याच्याशी काहीही संबंध नाही.'

ह्याप्रमाणे थोडावेळ दोघांमध्ये वादविवाद झाल्यावर कपिंजल म्हणाला, 'आपण आपला तंटा एखाद्या शास्त्रीबुवाकडे नेऊ व तो जो निकाल देईल त्याच्या

32U7 2013100

प्रमाणे वागू!' सशाने ते कबूल केले व ते शास्त्रीबुवाकडे जाण्यास निघाले.



ससा व चिमणा यांचा तो संवाद एका रानमांजराने ऐकला. तेव्हा तो बोका बोवा बनला व त्यांच्या वाटेवरच एका नदीच्या काठी संध्या, जप वगैरे करीत बसला.

ससा व चिमणा जवळ आलेले पाहून तो मोठ्याने बोलू लागला, 'हा संसार असार आहे. प्राण केव्हा जाईल याचा नेम नाही. प्राणाला धर्मावाचून दुसरा कशाचाच आधार नाही. धर्मकर्माशिवाय जो आयुष्य घालवितो, त्याचे जगणे व्यर्थ आहे. परोपकारासारखे दुसरे पुण्य नाही.'

हे त्याचे साधुपणाचे बोलणे ऐकून ससा म्हणाला, 'हा बोका मोठा साधू दिसतो. ह्याला धर्माचे फार चांगले ज्ञान आहे असे त्याच्या बोलण्यावरून दिसते तेव्हा ह्यालाच आपण न्यायाधीश नेमू.'

कपिंजल म्हणाला, 'हा प्राणी आपला जन्मवैरी आहे. तेव्हा आपण त्याच्याशी दुरूनच बोलू.'

त्याप्रमाणे त्या दोघांनीही दूर उभे राहून आपली हकीगत त्याला सांगितली व न्याय देण्यास सांगितले.

बोकेशास्त्री साधुपणाच्या पुष्कळ गोष्टी सांगून म्हणाले, 'मी म्हातारा झालो आहे, ह्यामुळे मला ऐकायला जरा कमी येऊ लागले आहे. तुम्ही खुशाल जवळ येऊन आपली सर्व् हकीगत सांगा. मी योग्य न्याय देऊन तुमचा तंटा मिटवून टाकतो.

बोकेशास्त्र्यांच्या त्या गोड गोड भाषणाला ते दोघेही इतके भाळून गेले की, ते त्याच्या अगदी जवळ जाऊन अंगाला खेटून बसले. मांजराला तेच पाहिजे

होते. ते लगटून· बसतात न बसतात, तोच त्याने एकाला पंजा मारून व दुसऱ्याला आपल्या करवतीसारख्या दाढांनी ठार केले आणि खाऊन टाकले.

❖ ❖ ❖

बाल पंचतंत्र : २

गोष्ट चौथी

## मूर्ख बेडूक

एका विहिरीत गंगदत्त नावाचा बेडकांचा राजा राहात होता. त्याला त्याच्या भाऊबंदांनी अगदी भंडाऊन सोडल्यामुळे तो विहिरीबाहेर निघून गेला. बाहेर आल्यानंतर आपल्याला छळणाऱ्या भाऊबंदांचा सूड कसा उगवता येईल ह्याचा तो विचार करू लागला.

इतक्यात एक काळा साप बिळात शिरताना त्याने पाहिला. तेव्हा त्याच्याशी मैत्री करावयाची व त्याला विहिरीत नेऊन भाऊबंदांचा नाश करावयाचा, असे त्याने ठरवले.

नंतर तो त्या सापाच्या बिळाजवळ जाऊन त्याला हाका मारू लागला.

सापाने बिळातून विचारले, 'तुम्ही कोण आहां ?'


गंगदत्त म्हणाला, 'मी बेडकांचा राजा आहे. तुझ्याशी मैत्री करण्याकरता आलो आहे. माझ्या भाऊबंदांनी मला अत्यंत त्रास देऊन घालवून लावले. त्याबद्दल त्यांचा सूड घेण्याच्या कामात मला तुझी मदत पाहिजे.'

सापाने विचार केला, 'मी आता म्हातारा झालो आहे. मला उंदीर किंवा बेडूक पकडण्याची शक्ती नाही. तेव्हा ही संधी बरी आहे. याच्या सांगण्याप्रमाणे मी विहिरीत गेलो तर मला आपली उपजीविका पुष्कळ दिवस करता येईल.'

मग त्याने विहीर कशी आहे. तेथे कसे जायचे, तेथे राहायला जागा आहे की नाही, याची चौकशी केली. गंगदत्तने त्याची सर्व व्यवस्था नीट लावण्याचे कबूल केले; पण त्याला बजावले की, 'तू माझ्या नोकरचाकरांच्या व मंडळींच्या वाटेस जाता कामा नये. मी दाखवीन तेवढ्यांचाच समाचार घेतला पाहिजे.'

सापाने ते कबूल केले व तो त्याच्याबरोबर निघाला. गंगदत्तने त्याला रहाटगाडग्यावरून खाली नेले व पाण्याच्या सपाटीजवळ असलेल्या एका बिळात राहावयास सांगितले.

पुढे गंगदत्त त्याला रोज एकेक बेडूक दाखवू लागला. त्याला तर तो खाऊन टाकीच, पण गंगदत्तला न कळता आणखीही कित्येक बेडकांना गट्ट करून



टाकी. याप्रमाणे पुष्कळ बेडूक रोज मरू लागल्यामुळे लवकरच गंगदत्तचे सर्व भाऊबंद खलास झाले. एकदा सापाने गंगदत्तच्या मुलालाच गिळून टाकले. त्याबद्दल गंगदत्तला दुःख होऊन तो मोठ्याने रडू लागला व स्वत:लाच शिव्या देऊ लागला.

तेव्हा त्याची बायको त्याला म्हणाली, 'आपल्याच हातांनी तुम्ही आपल्या कुळाचा व भाऊबंदांचा नाश

केला. आता कशाला रडता? आता तरी त्या दुष्ट सापाला ठार मारण्याचा काही उपाय योजा.'

यानंतर काही दिवस लोटले. बेडकांच्या सर्व कुळाचा फडशा पडला. एकटा गंगदत्त उरला. तेव्हा साप त्याला म्हणाला, 'मित्रा, माझे प्राण भुकेने व्याकुळ होत आहेत. बेडूक तर सर्व संपले. माझी खाण्याची काही सोय कर; कारण तूच मला येथे आणले आहेस.'

गंगदत्तला साप आपल्यालाच खाईल की काय अशी भीती वाटत होती. तरी पण तो धीर धरून युक्तीने म्हणाला, 'मित्रा, मी असताना तू का काळजी करतोस? मला थोडा वेळ विहिरीच्या बाहेर जाऊ दे, म्हणजे मी दुसऱ्या विहिरीतल्या बेडकांना फूस लावून येथे आणतो.'

सापाला ते खरे वाटले व त्याने गंगदत्तला बाहेर जाण्यास सांगितले. गंगदत्त रहाटगाडग्यावर चढून बाहेर आला, तो पुनः आत गेलाच नाही.

साप वाट पाहून दमला. शेवटी शेजारच्या बिळात राहाणाऱ्या एका घोरपडीला तो म्हणाला, 'बाई, तुम्ही माझ्याकरता गंगदत्तकडे जा व त्याला सांगा की, दुसरे बेडूक आले नाहीत तरी चालेल; पण तू परत ये. तुझ्याशिवाय मला क्षणभरही चैन पडत नाही.'

सापाचीच दया येऊन घोरपडीने गंगदत्तला त्याचा निरोप सांगितला. तो ऐकून गंगदत्त म्हणाला, 'भुकेने व्याकुळ झालेला प्राणी कोणते पाप करणार नाही? तो हवे ते नीच कृत्य करील; म्हणून मी आता विहिरीकडे येणार नाही असा निरोप तुम्ही सापाला सांगा.' हे ऐकताच घोरपडीने त्याचा निरोप घेतला.

❖ ❖ ❖

समाप्त

❖ ❖ ❖

क्र. ३२५४ २०।३।८०
विषय बा. वा.
BVBK-0403274